**प्रेसनोट** दि. ३०/१०/२०२५

अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर घटकाकडून लोकसेवक श्री. संदिप सुधाकर खरबस, पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांचेवर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | सोलापूर घटक |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनिय सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | श्री. संदिप सुधाकर खरबस, पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २,०००/- रुपये. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | २,०००/- रुपये. |
| **पडताळणी दिनांक** | दि. ३०/१०/२०२५ |
| **सापळा दिनांक** | दि. ३०/१०/२०२५ |
| **ठिकाण** | पंचायत समिती कार्यालय दक्षिण सोलापूर व जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर (मो.नं. ९६५७९१७३१७) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर (मो.नं. ७०३८४०११००) |

**थोडक्यात माहिती :-** मौजे येळेगाव, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर यांचेकडून येळेगाव मध्ये शासनाचे १५ वा वित्त आयोग अंतर्गत सिमेंट कॉक्रीटरोडचे काम केले होते. सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर यातील तक्रारदार यांनी सदर कामाचे १,००,०००/- रुपयेचे बील मुल्यांकन प्रमाणपत्रा प्रमाणे मिळणेकरीता प्रस्ताव पंचायत समिती कार्यालय दक्षिण सोलापूर येथे सादर केल होता. त्याचा पाठपुरावा यातील तक्रारदार हे करत होते. तक्रारदार हे पाठपुरावा करत असताना सदर कामाचे मंजुर बीलाची रक्कम ग्रामपंचायत बँक खात्यामधून काढण्याची परवानगी देणेकरीता लोकसेवक श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर हे स्वतः साठी २०००/- रुपये लाच रक्कम मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दि. ३०/१०/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर येथे दिली होती.

यातील तक्रारदारने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ला.प्र.वि., सोलापूर पथकाने दि. ३०/१०/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता पडताळणीमध्ये श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर यांनी तक्रारदार यांचेकडे केलेल्या कामाची मंजुर बीलाची रक्कम ग्रामपंचायत बँक खात्यामधून काढण्यासाठी स्वतःसाठी म्हणून तक्रारदार यांचेकडे २,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, आज रोजी घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दि. ३०/१०/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील लोकसेवक श्री. संदिप खरबस, पद विस्तार अधिकारी, यांनी जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर येथे तक्रारदार यांचेकडून २०००/- रुपये लाच स्वीकारली असता रंगेहात पकडण्यात आले असून, त्यांच्या विरुध्द सदर बझार पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

**सदरची कारवाई पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि., पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक, श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि., पुणे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., पुणे, श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि., पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, श्री. शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, पोह अतुल घाडगे, स्वामीराव जाधव, सलीम मुल्ला सर्व नेम- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरीक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयास खालील क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर (मो.नं. ९८२३२२५४६५) यांनी केले आहे.**

**१) अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२३१२६६८,**

**२) व्हॉट्स-अॅप क्रमांक – ९४०४००१०६४ (सोलापूर),**

**३) ई मेलआयडी - सोलापूर dyspacbsolapur@gmail.com**

**४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in**

**५) ऑनलाईन तक्रार अॅप- www.acbmaharashtra.net.in**

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

30/10/25

(प्रशांत चौगुले)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचतपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर